आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ नोव्हेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा पाळावी, असे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

- चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाच्या जीडीपीत ८ पूर्णांक २ दशांश इतकी दीड वर्षांतली उच्चांकी वाढ

- बँका आणि वित्तीय संस्थांच्या कार्यसुलभतेसाठी २४४ बृहत परिपत्रकं रिझर्व्ह बँकेकडून प्रसिद्ध

- हाँगकाँगमध्ये रहिवासी संकुलाला लागलेल्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या १२८वर

**आणि**

- ५६व्या इफ्फीच्या समारोप सोहळ्याला पणजी इथं सुरुवात, ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत आणि निर्माते व्ही. शांताराम यांचा गौरव

**<><><><><>**

निवडणुका जाहीर न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा पाळावी, जिथे निवडणूक प्रक्रिया सुरू झालेली आहे, तिथल्या निवडणुकांचा निकाल यासंदर्भातल्या याचिकांच्या निर्णयावर अवलंबून असेल, असं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. याप्रकरणी पुढची सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड कॅप्सूल***

*(राज्यातल्या ४० नगर परिषदा, १७ नगर पंचायती, ८३ पंचायत समिती, १७ जिल्हा परिषद, आणि २ महापालिकांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेचं उल्लंघन झालं आहे. बांठिया आयोगाच्या शिफारसीनुसार राज्य सरकारच्या या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठ समोर सुनावणी झाली. उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अधिसूचना जारी करण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयानं*

*मोकळा केला. सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल या याचिकांच्या निर्णयावर अवलंबून असतील, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं. याविषयी वकील देवदत्त पालोदकर म्हणाले…*

***होल्ड - देवदत्त पालोदकर बाइट***

*याप्रकरणाची पुढची सुनावणी २१ जानेवारीला, तीन सदस्यीय खंडपीठासमोर होईल, असं आज न्यायालयानं आज सांगितलं.*

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादनात ८ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ झाली. गेल्या दीड वर्षांतली ही उच्चांकी पातळी आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने आज जुलै ते सप्टेंबर या तिमाहीची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यापूर्वीच्या तिमाहीत म्हणजे एप्रिल ते जून दरम्यान जीडीपी वाढ ७ पूर्णांक ८ दशांश टक्के होती. तर गेल्या वर्षीच्या जुलै ते सप्टेंबर या कालावधीत ती ५ पूर्णांक ६ दशांश टक्के होती.

जीडीपीतली ८ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ ही प्रोत्साहन देणारी असून सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचं हे निदर्शक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

देशाची वेगवान आर्थिक वाढ आणि अर्थव्यवस्थेची गती यातून दिसत असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं गेल्या कित्येक वर्षात जारी केलेल्या ९ हजारांहून अधिक परिपत्रकांची जागा आता २४४ बृहत परिपत्रकं भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज प्रसिद्ध केली. यापूर्वी बँका, वित्तीय संस्था, सहकारी संस्था आणि इतर संस्थांना ९ हजारांहून अधिक परिपत्रकांचं पालन करावं लागत होतं. आता केवळ २४४ बृहत परिपत्रकांची अंमलबजावणी करावी लागणार असल्यानं त्यांच्या कामकाजात सुलभता येणार आहे. गेल्या ५-६ महिन्यांपासून यासाठी प्रयत्न सुरू होते, अशी माहिती रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर शिरीष चंद्र मुर्मू यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

युवा पिढी ही देशाच्या भविष्याचे शिल्पकार असून महान संस्कृती आणि परंपरेचे रक्षक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. लखनौमध्ये भारत स्काऊट आणि गाइडच्या हीरक महोत्सवी समारंभात त्या बोलत होत्या. देशातल्या युवांना मार्गदर्शन करण्यात आणि त्यांना प्रेरणा देण्यातल्या स्काऊट आणि गाइडनं दिलेल्या योगदानाचं त्यांनी कौतुक केलं. देशाच्या विविध भागातले ३३ हजारांहून अधिक स्काऊट, गाईड तसंच आशिया प्रशांत क्षेत्रातले दीड हजारांहून अधिक युवा या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

देशवासीयांनी देशाच्या हितासाठी ९ प्रतिज्ञा घ्याव्यात, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. कर्नाटकातल्या उडुपी इथल्या श्री कृष्ण मठातल्या कार्यक्रमात ते बोलत होते. जलसंरक्षण, वृक्ष लागवड, गरिबी हटाव, पारंपरिक ग्रंथांचं संवर्धन, स्वदेशीचा अंगिकार, नैसर्गिक शेतीचा अवलंब, भरड धान्याचा वापर, तेलाचा वापर कमी करणं आणि योगाभ्यासाला दैनंदिन जीवनाचा भाग करण्याचं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. ऐतिहासिक आणि पारंपरिक महत्त्वाच्या २५ ठिकाणांना नागरिकांनी भेट द्यावी असंही ते यावेळी म्हणाले. गीतेतला उपदेश सरकारच्या अनेक उपक्रमात वापरला जात असल्याचंही ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री***

लोकांच्या एकतेतूनच विकसित भारताचा मार्ग जात असल्याचं प्रतिपादनही प्रधानमंत्र्यांनी आज म्हणाले. गोव्यातल्या गोकर्ण पर्तगळी जीवोत्तम मठाच्या अनुयायांना ते संबोधित करत होते. अनेक संकटांचा सामना केल्यानंतरही गोव्यानं मूळ संस्कृती जपली आहे आणि त्याचं पुनरुज्जीवन केलं, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी त्यांनी १० हजार वर्गफूट क्षेत्रावरच्या रामायण थीम पार्कचं उद्घाटनही केलं. तसंच विशेष नाणं आणि टपाल तिकिटाचं अनावरण केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या जगदालपूरमध्ये आज १० नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. त्यात चैतू ऊर्फ श्याम दादा याचाही समावेश आहे. २०१३ मध्ये

नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात काही वरिष्ठ काँग्रेस नेत्यांसह ३० जणांचा मृत्यू झाला होता. चैतूनं या हल्ल्याचा कट रचला होता.

<><><><><>

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या ४ डिसेंबर रोजी तेविसाव्या भारत- रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात येणार आहेत. त्यांच्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू खास मेजवानीचं आयोजन करणार आहेत. आपल्या दोन दिवसीय दौऱ्यात ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. उभय देशांमधली धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या दृष्टीनं त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण होईल.

<><><><><>

हाँगकाँगमध्ये रहिवासी संकुलाला लागलेल्या आगीत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १२८वर गेली आहे. २९ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू असून ७ जणांची प्रकृती गंभीर आहे. २७९ जण अद्याप बेपत्ता आहेत. या इमारतीत नूतनीकरणाचं काम सुरू असल्यानं मोठ्या प्रमाणात ज्वालाग्रही पदार्थ इथं होते, त्यामुळं आग वेगानं पसरल्याचं पोलीस तपासात समोर आल्यानंतर हे काम करणाऱ्या ८ जणांना पोलिसांनी अटक केली.

<><><><><>

पुढचे १०० जन्मसुद्धा रजनीकांत म्हणूनच मिळाले, तर आवडेल, अशी प्रतिक्रिया प्रख्यात अभिनेते रजनीकांत यांनी आज दिली. चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दल इफ्फी, अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप समारंभात रजनीकांत यांचा आणि प्रख्यात दिग्दर्शक व्ही. शांताराम यांचा विशेष सन्मान झाला. याबद्दल रजनीकांत यांनी केंद्र सरकारचे आभार मानले. यंदाच्या इफ्फी मध्ये पहिल्यांदाच ५० महिला दिग्दर्शकांच्या चित्रपटांचं प्रदर्शन झालं, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यावेळी म्हणाले.

५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ‘अ यूजफुल घोस्ट’ हा शेवटचा चित्रपट दाखवला गेला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, सचिव संजय जाजू, महोत्सवाचे संचालक शेखर कपूर यांच्यासह विविध मान्यवर आणि मनोरंजन क्षेत्रातले कलाकारांच्या उपस्थितीत इफ्फीचा समारोप होत आहे. उत्कृष्ट वेब सीरिजचा पुरस्कार यंदा ‘बंदिश बँडिट्स २’ ला देण्यात आला. प्रतिष्ठेचं आयसीएफटी-युनेस्को गांधी पदक, एरिक स्वेनसन

दिग्दर्शित 'सेफ हाऊस' या चित्रपटानं पटकावलं. महोत्सवातल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटाला मानाचा सुवर्णमयूर पुरस्कार, तर दुसऱ्या क्रमांकाच्या चित्रपटाला रौप्यमयूर पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येईल.

**//<><><><><>//**